# कोरोना लॉकडाऊन व पर्यावरण स्थिती: एक अध्ययन

**सचिन काळे**

**प्रस्तावना:**

कोरोना हा एक व्हायरस आहे, जो संक्रमणाच्या माध्यमाने आजपर्यंतच्या रोगांपैकी सर्वात जलद पसरणारा व्हायरस आहे. या व्हायरसमुळे प्रत्येक दिवशी लाखो लोक संक्रमित होत आहेत. यामागे कारण असे आहे की हा व्हायरस काही सेकंदातच एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीस संक्रमित करतो. असे म्हटले जाते की हा व्हायरस हवेच्या माध्यमाने सुद्धा पसरतो. आज संपूर्ण जगात या वायरसने महामारी चे रूप धारण केले आहे. ज्यामुळे लाखो लोक संक्रमित होऊन खूप मोठ्या प्रमाणात मृत्यू होत आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशने कोरोना या आजाराला वैश्विक महामारी घोषित केले आहे.

कोरोना ही २०२० पासून सुरु झालेली ही सर्वात मोठी आपत्ती होय. आजतायागत जगभरात कोरोना विषाणूच्या संसर्गाने लाखांहून अधिक मृत्यू झाल्याची नोंद आहे. कोरोना विषाणूचे संक्रमण व त्यामुळे होणार्या अनपेक्षित मृत्यूची आकडेवारी ही भयंकर परिस्थितीची तीव्रता दर्शविते. जागतिक आरोग्य संघटनेनेदेखील याला जागतिक महामारी म्हणून घोषित केले आहे. कोरोनाव्हायरसचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जगातील सर्व देशांनी राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करत या संसर्गाचे प्रसारण नियंत्रित करण्यासाठीचे आंशिक व संपूर्ण लाँकडाऊन स्वीकारले होते.

भारत सरकारने काही कडक व सतर्कतेचे धोरण स्वीकारत २० मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लाँकडाऊन जाहीर केले.या साथीच्या परिस्थितीमुळे सर्वकाही ठप्प झाले आहे. मग ते उद्योगधंदे असो, कंपन्या किंवा शाळा अथवा कारखाने, सर्वत्र व्यापक कोरोनाव्हायरस संसर्गामुळे तात्पुरते बंद केले आहे. यामुळे उड्डाणे आणि इतर प्रवासही र केले गेले. ह्या लाँकडाऊनच्या कालावधीत काही लोकांनी आपली नोकरी गमावली होती तर काही लोक रोजचे अन्न मिळवण्यासाठी धडपडत होते.

**कोरोना लॉकडाऊनचा पर्यावरणावरील परिणाम:**

देशव्यापी लाँकडाऊनमध्ये देशभरातील अत्यावश्यक क्षेत्रे वगळता सर्व प्रकारचे कारखाने, उद्योगधंदे, बांधकाम कामे, सार्वजनिक व वैयक्तिक वाहतूक बंद आहे. यापैकी बहुतेक क्षेत्रांमध्ये जीवाश्म इंधन आधारित ऊर्जा स्त्रोतांचा वापर केला जातो. जे अँथ्रोपोजेनिक प्रदूषके व ग्रीनहाउस वायूंचे मुख्य स्त्रोत

आहेत.हेच मुख्य दोन घटक हवामान बदलास जबाबदार ठरतात. परंतु लॉंकडाऊनच्या काळात वाहनांच्या व औद्योगिक उत्सर्जनावरील सत्तेवरील निर्बंधामुळे हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली आहे.

कोरोनाव्हायरस प्रेरित लॉकडाऊन केवळ हवेच्या गुणवत्तेच्या दृष्टीने फायदेशीर ठरत नाही तर पाण्याची गुणवत्ता आणि नदीच्या यंत्रणेच्या आरोग्यावरही त्याचा अधिक परिणाम झालेला दिसून आला आहे. कारखाने, उद्योगधंद्यामधून रासायनिक प्रदूषकांचे नद्यांमध्ये विसर्ग पूर्णपणे बंद झाले आहे ज्यामुळे शहरी समुद्राजवळ  नद्यांच्या प्रदुषण भागात विलक्षण घट झाली आहे. तथापि नद्यांच्या स्वयं-शुध्दीकरण क्षमतेत देखील वाढ झाली आहे. भारत सरकार कोट्यावधी पैसा लावत या नद्यांना शुद्ध करण्याचे काम कित्येक अशा प्रोजेक्टच्या माध्यमांद्वारे हाती घेत असते पण हवा तसा निकाल सरकारला एवढा पैसा खर्च करून देखील मिळाला नव्हता जितका ह्या लॉकडाऊनच्या कालावधीत मिळाला.

वातावरण शांत व स्थीर झाल्यावर वन्यजीवन नेहमीच आनंदी असते वन्यप्राणी केवळ त्यांच्याच भागातच नव्हे तर बाहेरील भागात देखील फिरत असतात. अगदी अशाच प्रकारचे चित्र या कालावधीत दिसून आले. मानवाने आजवर वन्यप्राण्यांच्या निवासस्थानावर आपला हक्क गाजवत जे कॉंक्रीटचे जंगल विकसित केले आहे त्याच जंगलात आज हे वन्यप्राणी मुक्तपणे फिरत आहेत.

कोविड १९ ने निर्माण केलेले संकट पाहता, अनेक देश कार्बनचे उत्सर्जन रोखण्यासाठी जलदगतीने काम करता येईल, यासाठी भविष्याचा विचार करून आखलेली धोरणे स्वीकारू शकतात, अशीही मोठी शक्यता निर्माण झाली आहे. त्याचे कारण म्हणजे हवामानातल्या बदलामुळे अशा प्रकारचे आजार सातत्याने उद्भवतील अशीही शक्यता आहेच. जागतिक विकासाच्या प्रक्रियेत समोर जी आव्हाने आहेत, त्यावरच्या दीर्घकालीन उपाययोजना या वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानावरच आधारलेल्या असणार आहेत.

जरी या वायरसवर पुर्णपणे प्रभावी औषधी तयार झालेली नाही, तरीही काही लहान-मोठे उपाय आहेत ज्यांना करून आपण या कोरोनाव्हायरस पासून दूर राहू शकतो. जसे परत-परत हातांना वाहत्या पाण्यात धुऊन घेणे. सॅनिटायझर चा वापर करणे. नेहमी बाहेर जाताना मास्क लावणे व घरी आल्यावर ६०% अल्कोहल असलेल्या सॅनिटायझर ने हात स्वच्छ करणे. शिंकताना किंवा खोकलताना चेहऱ्यावर रुमाल धरणे. इत्यादी काही उपाय आहेत ज्यांचे पालन आपण केले तर कोरोनाव्हायरस ला आपल्यापासून लांब ठेवू शकतो.

## निष्कर्ष:

भारत हा हवामान बदलांसंदर्भातल्या घडामोडिंविषयीचा एक महत्वाचा देश आहे. जागतिक स्तरावरील हवामानासंदर्भात विविध करारात हिरीरीने भाग घेणारा देश आहे. अगदी आजच्या दिवसापर्यंत सुद्धा कोरोना चे संकट / कोरोना महामारी अजून पूर्णपणे नाहीसे झालेले नाही. सुदैवाची बाब अशी की आता या महामारी वर लस शोधण्यात सरकारला यश आलं आहे. तरी जोपर्यंत सर्वांना लस मिळत नाही तोपर्यंत आपण काळजीचे सर्व नियम पाळले पाहिजेत.लोकांनी या संकटातून शिकलं पाहिजे की आपण निसर्गाच्या नियमांचा दुरुपयोग केला तर आपल्यावर संकट येणारच आहे. मानवता हा धर्म मानून आपण निसर्गाची आपण पूजा केली पाहिजे. त्याने आपल्याला भरभरून दिलं आहे त्याचा योग्य आणि व्यवस्थित वापर केला तर आपण प्रत्येक संकट परतवून लावू शकतो. कोरोना लॉकडाऊनच्या निमित्ताने का होईना परंतु निसर्ग त्याच्या मुळ / आदर्श स्थितीत येऊ शकतो याचा प्रत्यय या निमित्ताने आलेला आहे. त्यापासून मानव काही बोध घेईल ही आशा.

## संदर्भ:

Ahuja, R. (1999): Social problems in India. Rawat Publications, Jawahar Nagar, Jaipur.

Barthakur, M. (1986): Weather and climate of North East India. North-Eastern Geographer, 18 (1 and 2), 20-27

Drever, F. and Whitehead, M., eds. (1997): Health inequalities. Office for National Statistics,London.

Fisher, R.A.(2006): Statistical methods for research workers. Cosmo Publications, New Delhi.

Maurya, S. D. (1989): Urbanization and Environmental problems. Chugh Publications, Allahbad.

Wilkinson, R. G.(1996):Unhealthy societies:The afflictions of inequality. Routledge, London.